सरतपास शपथेवर सुरु

शपथपत्राच्या आधारे खालील दस्तऐवजांना निशाणी देणेत आली.

**उलटतपास शपथेवर सुरु**

**उलटतपास प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. आय.एम. जमादार यांचे तर्फे सुरु :-**

२८. माझे शिक्षण दहावी पर्यंत झाले आहे. मी प्लॉट खरेदी विक्री देणे-घेणेचा व्यवहार करतो. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही विक्री योग्य आहे किंवा नाही याची खात्री करुन मी प्रतिवादी बरोबर करार केला. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही प्रतिवादीचे वडिलांची आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही प्रतिवादीची खरेदीची आहे हे मी खोटे सांगत आहे. प्रतिज्ञापत्र दाखल करताना मी करार वाचला होता. हे म्हणणे खरे नाही की, करारपत्रात मिळकत वडिलार्जित आहे असे लिहिल्याचे खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की, करारपत्रात मिळकत प्रतिवादीने स्वत: खरेदी केलेली आहे असे लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, करारपत्रात मिळकत वडिलार्जित आहे असे लिहिले आहे.

२९. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीला ब-याच लोकांचे देणे झाले असल्याने त्याने मिळकत विक्रीला काढली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी विरुध्द ब-याच लोकांनी रक्कम वसुली करिता केसीस दाखल केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे बाजार मुल्य काय आहे याची चौकशी करुन दावा मिळकतीची किंमत माझे संमत्तीने चाळीस लाख ठरविणेत आली. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०.११.२०१४ रोजीच्या कराराने दावा मिळकत ही मी सांगितलेल्या व्यक्तीचे नांवाने खरेदी देणेचे ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करे पर्यंत कोणत्याही व्यक्तीचे नांव खरेदीपत्रासाठी प्रतिवादीला सुचविलेले नाही.

३०. हे म्हणणे खरे आहे की, मी धनादेश क्र. २४७४२१ दिनांक १४.११.२०१४ भारतीय स्टेट बँक शाखा- इचलकरंजी चा प्रतिवादीला दिला होता

याबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा धनादेश परत घेऊन प्रतिवादीस मी रक्कम रुपये एक लाख दिले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादीला रक्कम रुपये एक लाख दिल्याचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २८.१२.२०१४ रोजी मी प्रतिवादीला रोख रक्कम रुपये दिले याबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०.११.२०१४ रोजीचा करार करताना मुदत ठरलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, मुदतीच्या अटी महत्वाच्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.११.२०१४ रोजीच्या करारप्रमाणे चार महिन्यात व्यवहार पुर्ण करावयाचा होता. दिनांक १०.११.२०१४ रोजीचा करारामध्ये चार महिन्याच्या आत व्यवहार पुर्ण करावयाचा होता अशी माहिती मी वकिलांना दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०.०३.२०१५ रोजी कराराची मुदत पुर्ण होते. हे म्हणणे खरे आहे की, मी उर्वरित रक्कम प्रतिवादीला अदा केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, या मुदतीमध्ये मी प्रतिवादीला नोटीस पाठविलेली नाही.

३१. व्यवहार पुर्ण करणेसाठी कोणती तांत्रीक अडचण होती याची माहिती मी वकिलांना दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदरची मिळकत खरेदी करणेस कोणत्याही शासकिय परवानगीची आवश्यकता नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०.११.२०१४ व १२.०५.२०१५ चे करारास कोणत्या शासकिय परवानगीची आवश्यकता आहे असे करारपत्रात नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १२.५.२०१५ ते ५.४.२०१८ या तारखेदरम्यान मी प्रतिवादीला कोणतीही नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२.५.२०१५ रोजी ठरलेल्या कराराप्रमाणे मी प्रतिवादीला उर्वरित रक्कम दिलेली नाही. मी उर्वरित रक्कम प्रतिवादीला अदा केल्या बाबतची माहिती वकिलांना दिली होती. उर्वरित रक्कम मी प्रतिवादीला दिल्याबाबतची माहिती माझे सरतपासाचे वेळी माझे वकिलांना दिली होती परंतु ती माहिती माझे सरतपासात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

३२. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी बरोबर केलेल्या व्यवहारा मुळे मला मेंदुचा कोणताही आजार झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर व्यवहारामुळे माझे मेंदुला आजार झाला असा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजारी होतो व माझे मेंदुचे ऑपरेशन झाले हे मी सरतपासात खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, औषधोपचारासाठी दहा ते पंधरा लाख रुपये खर्च झाले असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. असा पुरावा दाखल करणेस मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, भुखंडचे विभाजन केले शिवाय जमीनाचा व्यवहार करता येत नाही असा कोणताही पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, क.ग.नं. ५४४ याचे एकुण क्षेत्र १९३८.६ चौ.फुट असा अखंड एक भुखंड होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या अखंड भुखंडाचा व्यवहार झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, भुखंडाचे विभाजन केल्या शिवाय व्यवहार होत नाही हे मी खोटे कारण नमुद केले आहे.

३३. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ५.४.२०१८ रोजी माझे सांगणेवरुन ॲड. बडवे यांचे मार्फत प्रतिवादीला नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोटीसीवरुन शिल्लक रक्कम स्वीकारुन खरेदीपत्र पुर्ण करुन द्यावे अशी मी मागणी केली होती. सदर नोटीसीतील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. खरेदीपत्र करुन देणेविषयी मी बडवे वकिलांचे मार्फत नोटीस पाठविली होती हा माझे सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला दिलेल्या नोटीसीमधील हिशोब केला असता रक्कम रुपये एकोणीस लाख अशी होते. हे म्हणणे खरे नाही की, रक्कमे मध्ये खाडाखोड करुन एकवीस लाख रुपये करणेत आली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १६.४.२०१८ रोजी माझ्या नोटीसीला ॲड. आय.एम. जमादार यांचे मार्फत प्रतिवादींनी उत्तर दिले होते. मी ते उत्तर वाचुन पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, उत्तरी नोटीसीबाबत मजकुर माझ्या प्रतिज्ञापत्रात कसा आला याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, एकवीस लाख रुपये अदा करुन सात दिवसाच्या आत खरेदीपत्र पुर्ण करुन घ्या असे

मला प्रतिवादीने कळविले होते.

३४. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६१ सोबतचे दोन्ही करार रद्द व्हावे म्हणुन मी प्रतिवादीस नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६१ सोबतचे दोन्ही करार रद्द केलेले नाहीत. हे मला माहित नाही की, मला एकतर्फा करार रद्द करता येणार नाही. हे मला माहित नाही की, करार आपोआप रद्द होईल किंवा एखादी अटी शर्ती रद्द होईल असे करारपत्रात नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी तर्फे वकिल श्री.आय.एम. जमादार यांनी खरेदीपत्र पुर्ण करुन घ्या असे कळविले नंतर देखील मी खरेदीपत्र पुर्ण करुन घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, करारपत्र पुर्ण करुन देणेस प्रतिवादी तयार असताना देखील मी एकतर्फे करार रद्द केला. हे म्हणणे खरे नाही की, वकिल श्री. बडवे यांनी दिलेल्या नोटीसीच्या विरुध्द जाऊन मला दावा करणेचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १२.५.२०१५ ते ५.४.२०१८ या दरम्यान माझे कडे रक्कम शिल्लक आहे असे प्रतिवादीला कळविलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १४.११.२०१४ व १२.५.२०१५ या तारखांना माझेकडे व्यवहार पुरा करणे इतपत रक्कम उपलब्ध नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, रक्कम उपलब्ध करणेसाठी मला वेळ हवा होता. हे म्हणणे खरे नाही की, मी वेळेत व्यवहार पुर्ण केला नाही. हे मला माहित नाही की, मी वेळेत व्यवहार पुर्ण न केल्याने प्रतिवादींना देणेक-यांच्या मुळे त्रास सहन करावा लागला. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना रक्कम रुपये आठ लाख नुकसान भरपाई देणे लागतो. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीपत्र पुर्ण करुन दिले नसलेने संचकाराची रक्कम मागणेचा मला अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझेत व प्रतिवादी मध्ये १८ टक्के प्रमाणे व्याज देणेचे ठरलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने मला एकवीस लाखावर १८ टक्के दराने रक्कम देय लागत नाही.

३५. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं.१ व २ ने प्रतिवादी नं.३ विशाल यांस दावा मिळकत विक्री केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं.१ व २

यांनी प्रतिवादी नं.३ ला करुन दिलेले खरेदीपत्र मी कोणत्याही न्यायालयात रद्द करुन मागितलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजारपणामुळे मी व्यवहार पुर्ण न करणेचा निर्णय घेतला हे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला खरेदी घेणेचे नाही व दुस-यांना सुध्दा विकणेचे नाही अशी माझी मागणी आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही चाळीस लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कमेस खरेदी घेणारा ग्राहक मला मिळाला नाही म्हणुन मी दावा मिळकती बाबतचा व्यवहार पुर्ण केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला त्रास व्हावा अशी माझी इच्छा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्वीकृत्त,

Digitally signed by
GANI MANIK NADAF
Date: 2025.09.30
15:30:40 +0530

दिनांक – २९.०९.२०२५

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.